# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

दिनांक 16.05.2019 गुरूवार

(गुन्हे)

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 06 केसस 06 आरोपींना अटक करून, 24,905 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 04 केसस 07 आरोपींना अटक करून 5,515 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा–या 92 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 618 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 1,62,600 वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. प्रतापनगर – चोरी :**

दिनांक 23.04.2019 चे 1630 वा ते दिनांक 04.05.2019 चे 1300 वा दरम्यान पो.स्टे प्रतापनगर हद्दीत प्लॉट नं. 5 प्रभाकर देवराव कुथे फ्रेन्डस सोसायटी, दिनदयाल नगर, आय.सी.आय. सी बॅंक प्रतापनगर शाखेच्या जवळ रिंग रोड, नागपुर येथे राहणा–या फिर्यादी श्रीमती अल्का उदय नायक, वय 55 वर्ष, या आपल्या घरी हजर असतांना किंवा नसतांना फिर्यादीच्या घरी काम करणा–या नोंकरापैकी किंवा आलेल्या पाहुण्यापैकी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची नजर चुकवुन त्यांच्या बेडरूम मधील ड्रेसींग टेबलच्या ड्राव्हर मध्ये ठेवलेले हि–याचे व सोन्याचे दागीणे असा एकुण 4,36,182 रू चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे प्रतापनगर येथे सपोउपनि शेषराव कामडी, 9923203326 यांनी आरोपीविरूध्द कलम 380 भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) पो.स्टे. सिताबर्डी – जबरी चोरी :**

दिनांक 14.05.19 चे 1945 वा चे सुमारास फिर्यादी सौ. बबीता संजय पुर्वे, वय 42 वर्ष, रा. ए 501, हरेराम रेसीडेन्सी, 402, खोडे मार्ग, खरे टाऊन, नागपूर या पायदळ जात असतांना पो.स्टे. सिताबर्डी हद्दीत खरे टाऊन, धरमपेठ, ओराईपल ऑप्टीकल बिल्डींगचे बाजुची खाली बिल्डींग जवळ नागपूर येथे अज्ञात दुचाकी चालकाने फिर्यादी जवळ येवून त्यांच्या गळयातील सोन्याची चैन किं, 20,000 रू ची जबरीने हिसकावून चोरून नेली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. सिताबर्डी येथे पोउपनि चौधरी, 9823023903 यांनी आरोपीविरूध्द कलम 392 भादंवि अन्वये गुन्हा नोदविला आहे.

**4) पो.स्टे. अजनी – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 15.05.19 चे 1130 वा ते 1200 वा दरम्यान पो.स्टे. अजनी हद्दीत राहणा–या फिर्यादी यांची 13 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि घरी कोणाला काही न सांगता निघुन गेली. परत आली नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे. अजनी येथे पोउपनि एस.एस. नानोटे, 9823561130 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

5) पो.स्टे. हिंगणा – प्राणांतिक अपघात :

दिनांक 15.05.2019 चे 2345 वा चे सुमारास फिर्यादी गणेश ताराचंद शेडें, वय 24 वर्ष, रा. भोसले वाडी, नागपूर व त्याचा मित्र फैजान अलीम शेख, वय 15 वर्ष, रा. रायपुर, वार्ड क्र. 4, नागपूर हे दोन्ही पायदळ जात असतांना पो.स्टे. हिंगणा हद्दीत कवळस रोड ग्रामीण रूग्णालय समोर, नागपूर येथे पॅशन प्लस गाडी क्र. एमएच/40/के/5705 चा आरोपी चालक याने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणाने चालवून फैजान याला धडक मारून गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभूत ठरला. याप्रकरणी फिर्यादी याने दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. हिंगणा येथे पोउपनि पवार, 7350240831 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,304(अ) भादंवि सहकलम 184 मोवाका अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

6) पो.स्टे. सक्करदरा, कोराडी – विनयभंग :

1) सक्करदरा – दिनांक 16.12.2016 चे 1100 वा ते दिनांक 15.05.19 चे 2000 वा दरम्यान पो.स्टे. सक्करदरा हद्दीत राहणा–या 38 वर्षीय फिर्यादीस आरोपी संजय बाळकृष्ण मुळे, वय 57 वर्ष, रा. प्लॉट नं 45, मेहर कॉलनी, नागपूर याने फिर्यादीचा पाठलाग करून तसेच फिर्यादीचे घरी जावून फिर्यादी व त्यांचे वडीलांना अश्लील शिवीगाळ करून मारण्याची धमकी देवून तसेच फिर्यादीचे मोबाईलवर वेळोवेळी अश्लील मॅसेज पाठवून विनयभंग केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. सक्करदरा येथे पोउपनि धडे, 8983072567 यांनी आरोपीविरूध्द कलम 354(ड),506(ब),509 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

2) कोराडी – दिनांक 15.05.19 चे 1400 वा चे सुमारास पो.स्टे. कोराडी हद्दीत राहणा–या 40 वर्षीय फिर्यादी या आपल्या घरी हजर असतांना वस्तीत राहणारा आरोपी श्रीराम मंगल टेकाम, वय 33 वर्ष याने फिर्यादीचे पती सोबत झालेल्या जुन्या भांडणाचे कारणावरून फिर्यादीचा हात पकडून त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला व फिर्यादीचे पतीला धमकी दिली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कोराडी येथे पोउपनि गंगाकाचुर, 8308729650 यांनी आरोपीविरूध्द कलम 354,504 भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे.

7) पो.स्टे. कोराडी – खंडणी मागणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :

दिनांक 15.05.19 चे 1000 वा चे सुमारास पो.स्टे. कोराडी हद्दीत ओम नगर, लक्की इंन्क्लेव्ह, फ्लॅट नं 301, नागपूर येथे राहणारे फिर्यादी अरूण उमाकांत पांडे, वय 37 वर्ष, मुळ पत्ता एअर पोर्ट स्टेशन, दादरी, गौतम बुध्द नगर, (उ.प्र.) हे आपल्या भावासह घरी हजर असतांना आरोपी अरूण ढवले, रा. कोराडी नाका, नागपूर, 2) संदीप चतुर्वेदी, रा. रिवा, म.प्र. हे फिर्यादीचे घरी येवून फ्लॅट चे दाराला लाथा मारून शिवीगाळ करून घर खाली करण्याचा दबाव टाकु लागले फिर्यादी यांनी दार उघडले असता आरोपीने जबरीने फिर्यादीचे फ्लॅट मध्ये प्रवेश करून फिर्यादीस सदर फ्लॅटची नोटरी असल्याचे सांगुन घर खाली करण्यास दबाव टाकुन घर खाली न केल्यास त्या मोबदल्यात 5,00,000 रू ची खंडणीची मागणी केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कोराडी येथे पोउपनि गंगाकाचुर, 8308729650 यांनी आरोपीविरूध्द कलम 448,385,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

(अकस्मात मृत्यु)

पो.स्टे. यशोधरानगर, सिताबर्डी, तहसील :

1) यशोधरानगर – दिनांक 15.05.19 चे 1740 वा चे सुमारास पो.स्टे. यशोधरानगर हद्दीत प्लॉट नं 430, यादव नगर, नागपूर येथे राहणा–या कांताबाई रामाजी मेश्राम, वय 65 वर्ष यांची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. यशोधरानगर पोहवा गजानन शेलके, 7972779045 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

2) सिताबर्डी – दिनांक 15.05.19 चे 2000 वा पुर्वी अंदाजे 35 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. सिताबर्डी हद्दीत लोहापुल भिंती लगत मृत अवस्थेत मिळून आला. याप्रकरणी फिर्यादी मोहम्मद इकबाल अली मोहम्मद, वय 42 वर्ष, रा. घर नं 119, पिटसुर, गोरेवाडा,

नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. सिताबर्डी येथे पोउपनि चौधरी, 9823023903 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**4) तहसील** – दिनांक 15.05.19 चे 2300 वा चे सुमारास अंदाजे 40 ते 45 वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसम हा पो.स्टे. तहसील हद्दीत भारत माता चौक येथे बेशुध्द अवस्थेत मिळून आला त्यास उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. तहसील येथे सपोउपनि जेव्हीआर, 7768037524 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर